वर्ष - ६ ◆ अंक -३० ◆ पृष्ठे - ४ ◆ RNI NO. MAHMAR/2020/79677 ◆ ISSN NO. - 2582-9971 ◆ EPAPER.BHARATSANGRAM.ONLINE ◆ मुख्य संपादक : माधव आ. हिवाळे मो.नं. 9765332897

दैनिक

सोमवार, दि. २० जुलै २०२६

सत्याचा बुलंद आवाज

# भारत संग्राम

**TRENDING NEWS**

मुंबईतील कार्यक्रमात सलमान खान दुबळा दिसला:उतरलेला चेहरा, थकलेल्या डोळ्यांनी दिसला अभिनेता; चाहत्यांनी आरोग्याबद्दल चिंता व्यक्त केली



पान 3 वर

**# SHORT NEWS**

### 69 हजारांचा ऐवज लंपास

**यवतमाळ :** विश्वनाथ पार्क, दारव्हा रोड येथील एका घरातून सोन्या-चांदीच्या दागिन्यांसह लॅपटॉप चोरीला गेल्याची घटना घडली आहे. फिर्यादी इंद्रजित चंद्रकांत इसपाडे (33) हे जया ढवरी यांच्या घरी भाड्याने राहतात. 17 मार्च रोजी सकाळी 9 वाजेच्या सुमारास अनोळखी चोरट्याने त्यांच्या घरात प्रवेश करीत 54 हजार रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने आणि 15 हजार रुपयांचा लॅपटॉप, असा अंदाजित 69 हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी अवधूतवाडी पोलिसांनी चोरट्याविरुद्ध चोरीचा गुन्हा नोंदविला आहे.

### वृद्धाला काठीने बेदम मारहाण

**यवतमाळ :** घरकुलाचे पैसे का काढले नाही, अशी विचारणा केल्याच्या रागातून एका 65 वर्षीय वृद्धाला काठीने मारहाण केल्याची घटना ग्राम तीवसा येथे घडली. 16 मार्च रोजी सकाळी 7 वाजता फिर्यादी महादेव केशव राठोड यांनी आरोपी चेतन चव्हाण, भाऊराव चव्हाण आणि कुंदन चव्हाण (सर्व रा. तीवसा) यांना पैशांबाबत विचारले. याचा राग धरून आरोपींनी संगनमत करून महादेव यांना शिवीगाळ केली आणि डोक्यावर लाकडी काठीने मारून गंभीर जखमी केले. तसेच, जीवे मारण्याची धमकीही दिली. लाडखेड पोलिसांनी याप्रकरणी तीनही आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

### डिक्कीतील दीड लाख रुपये लंपास

**उमरखेड :** येथील पुसद रोडवर असलेल्या स्टेट बँकेसमोरून दुचाकीच्या डिक्कीत ठेवलेले 1 लाख 50 हजार रुपये अज्ञात चोरट्यांनी लांबवले. 17 मार्च रोजी सकाळी 11:30 वाजता ही घटना घडली. फिर्यादी अनिल रामचंद्र टाक (52, रा. आनंद नगर) यांनी दुचाकी बँकेसमोर उभी केली होती. यावेळी तीन अनोळखी इसमांनी संगनमत करून त्यांच्या दुचाकीच्या डिक्कीतील पिशवीत ठेवलेली एक लाख 50 हजार रुपयांची रोकड शिताफीने चोरून नेली. याप्रकरणी उमरखेड पोलिसांनी तीन अज्ञात आरोपींविरुद्ध चोरीचा गुन्हा नोंदविला आहे.

### शेळ्या लंपास

**घाटंजी :** तालुक्यातील दहेगाव येथील गोठ्यातून चोरट्याने तीन बकऱ्या चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. 13 मार्च रोजी पहाटे 5 वाजेच्या सुमारास ही घटना घडली. फिर्यादी रमेश गोविंदा राऊत (48, रा. दहेगाव) यांनी आपल्या बकऱ्या गोठ्यात बांधल्या होत्या. अज्ञात चोरट्याने संधी साधून त्यांच्या 27 हजार रुपये किमतीच्या एकूण तीन बकऱ्या लंपास केल्या. रमेश राऊत यांच्या तक्रारीवरून घाटंजी पोलिसांनी 18 मार्च रोजी अज्ञात चोरट्याविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# जंतरमंतरवर 10 हजार आंदोलक


## संसद मार्च थोड्याच वेळात:पोलिसांची परवानगी नाही, 5000 जवान तैनात; वांगचुक यांच्या उपोषण सोडण्यासाठी 3 अटी

**भारत संग्राम | प्रतिनिधी**

**नवी दिल्ली :** 'कॉकरोच जनता पार्टी'चे (CJP) सुमारे १०,००० निदर्शक जंतरमंतर येथे जमले आहेत. सकाळी निदर्शकांनी पोलिसांचे बॅरिकेड्स तोडले होते, मात्र आता परिस्थिती नियंत्रणात आहे.

CJP तर्फे सकाळी ९ वाजता जंतरमंतर ते संसद भवन अशी 'चलो संसद' (संसदेकडे कूच) रॅली काढली जाणार आहे. दिल्ली पोलिसांनी स्पष्ट केले आहे की, या रॅलीसाठी कोणतीही परवानगी घेण्यात आलेली नाही. दरम्यान, गेल्या २३ दिवसांपासून





उपोषणावर असलेल्या सोनम वांगचुक यांनी सांगितले आहे की, ते तीन अटींच्या आधारे आपले उपोषण मागे घेतील. पहिली अट म्हणजे, शिक्षण व्यवस्था आणि पेपरफुटीच्या (पेपर लीक) मुद्द्याची जबाबदारी सरकारने स्वीकारली पाहिजे. दुसरी अट, CJP च्या शिष्टमंडळाला संसदेत जाण्याची परवानगी मिळावी आणि खासदारांनी हा मुद्दा संसदेत मांडण्याचे आश्वासन त्यांना द्यावे. तिसरी अट, जर आरोग्याच्या कारणास्तव संसदेत जाणे शक्य नसेल, तर खासदारांनी सफदरजंग रुग्णालयात येऊन हे आश्वासन द्यावे. वांगचुक यांनी 'X' (पूर्वीचे ट्विटर) या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर दावा केला आहे की, त्यांना रुग्णालयात बेकायदेशीरपणे डांबून ठेवण्यात आले आहे आणि तिथे त्यांच्या हालचालींवर व अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर निर्बंध घालण्यात आले आहेत.


'कॉकरोच जनता पार्टी'चे (CJP) संस्थापक अभिजित दिपके म्हणाले, "आमच्या बाजूची कोणतीही व्यक्ती गैरप्रकार करणार नाही. हे आंदोलन आणि संसदेकडे होणारा मोर्चा पूर्णपणे शांततापूर्ण राहील, याची खात्री करणे ही आमची जबाबदारी आहे. आम्ही गेल्या महिन्याभरापासून येथे तळ ठोकून आहोत. सोनम वांगचुक यांनी या आंदोलनासाठी आपला जीव पणाला लावला आहे. आम्ही कोणत्याही परिस्थितीत या आंदोलनाची प्रतिमा मलीन होऊ देणार नाही." संविधानातील कलम १९ नागरिकांना शांततापूर्ण निदर्शने करण्याचा अधिकार देते.

तथापि, रॅली, मिरवणूक किंवा मोर्चा आयोजित करण्यासाठी प्रशासनाची परवानगी घेणे आवश्यक असते. कायदा व सुव्यवस्था, सुरक्षा आणि वाहतूक व्यवस्थापन यांसारख्या बाबींचा विचार करून प्रशासन परवानगी देते आणि त्यासाठी विशिष्ट नियमही निश्चित करते. या नियमांचे पालन करणे अनिवार्य आहे. जर परवानगीशिवाय मोर्चा काढण्याचा प्रयत्न केला गेला, तर कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने पोलीस त्यात हस्तक्षेप करून तो रोखू शकतात. आवश्यक वाटल्यास कायदेशीर कारवाईही केली जाऊ शकते.

## समृद्धी महामार्गावर भीषण अपघात:ट्रकच्या धडकेनंतर कारने घेतला पेट, 5 जणांचा जागीच मृत्यू

**भारत संग्राम | प्रतिनिधी**

**वर्धा :** समृद्धी महामार्गावर वर्ध्यातील विरूळ गावाजवळ पहाटेच्या सुमारास एक भीषण अपघात झाला आहे. या अपघातात पाच जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. नागपूरकडे जाणाऱ्या एका कारला मागून भरधाव येणाऱ्या मालवाहू वाहनाने जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भयंकर होती की, अपघात होताच कारने अचानक पेट घेतला आणि आगीच्या मोठ्या ज्वाळा उसळल्या. या दुर्घटनेत कारमधील चार जणांना बाहेर पडण्याची कोणतीही संधी मिळाली नाही आणि ते आतच जिवंत होरपळले. तर धडक देणाऱ्या मालवाहू वाहनातील एका व्यक्तीचाही मृत्यू झाला



असून, अन्य एक जण गंभीर जखमी झाला आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, या अपघाताचे मूळ कारण काल रात्री घडलेल्या एका दुसऱ्या घटनेत आहे. याच मार्गावर रात्रीच्या सुमारास इथेनॉल वाहून नेणारा एक टँकर पलटी झाला होता. त्यामुळे सुरक्षेचा उपाय म्हणून महामार्गाची एक बाजू बंद करून दुसऱ्या बाजूने एकेरी वाहतूक सुरू करण्यात आली होती. याच एकेरी मार्गावरून वाहतूक सुरू असताना, पहाटेच्या सुमारास विरूळ गावाजवळ एका मालवाहू वाहनाच्या चालकाचे स्वतःच्या वाहनावरील नियंत्रण सुटले. हे अनियंत्रित वाहन थेट समोरून चाललेल्या कारवर जाऊन जोरदार आदळले आणि त्यानंतर हा मृत्यूचा तांडव घडला. अपघाताची भीषणता इतकी भयानक होती की, मागून धडक बसताच कारच्या इंजिनने तत्काळ पेट घेतला. काही क्षणांतच संपूर्ण कारला आगीने वेढा घातला. कारचे दरवाजे लॉक झाल्यामुळे किंवा प्रवाशी बेशुद्ध पडल्यामुळे त्यांना गाडीतून खाली उतरून स्वतःचा जीव वाचवण्याची साधी संधीही मिळाली नाही. बघता बघता चारही जणांचा आगीत अत्यंत दुर्दैवी अंत झाला. या अपघातात मरण पावलेले सर्व प्रवासी हे प्राथमिक माहितीनुसार वर्धा जिल्ह्यातीलच रहिवासी असल्याचे समोर येत आहे. पोलीस सध्या त्यांच्या नातेवाईकांचा शोध घेत आहेत.

## एनसीसी तपासणीत श्री शिवाजी विद्यालयाचे कौतुक; विद्यार्थ्यांना अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन

**भारत संग्राम | प्रतिनिधी**

**✦ महेंद्र कुमार महाजन**

**रिसोड :** रिसोड प्रतिनिधी : श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, रिसोड येथे इलेव्हन महाराष्ट्र बटालियन, अकोला येथील अधिकाऱ्यांनी भेट देऊन एनसीसी युनिटची पाहणी केली. यावेळी एनसीसीच्या कामकाजाची तसेच विद्यार्थ्यांच्या तयारीची सविस्तर माहिती घेऊन अधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

एनसीसी प्रशिक्षक प्रा. अभिजीत देशमुख यांनी विद्यार्थ्यांची उत्कृष्ट तयारी करून घेतल्याबद्दल अधिकाऱ्यांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले. तसेच विद्यार्थ्यांच्या शिस्तीचे, सादरीकरणाचे



व एनसीसी उपक्रमांतील सहभागाचेही कौतुक करण्यात आले. भेटीदरम्यान श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य प्रा. जानराव देशमुख, उपप्राचार्य गजानन भिसडे, पर्यवेक्षक खुशाल राठोड, ज्येष्ठ प्राध्यापक अरुण लिमजे, प्रा. संतोष खानझोडे तसेच उर्दू प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक अनिस खान यांनी इलेव्हन महाराष्ट्र बटालियन, अकोला येथून आलेल्या अधिकाऱ्यांचे स्वागत केले. यावेळी अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना एनसीसीचे महत्त्व, शिस्त, नेतृत्वगुण, व्यक्तिमत्त्व विकास, देशसेवा तसेच एनसीसीमधील विविध संधी याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये एनसीसीबाबत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

## विद्यार्थ्यांमध्ये कायद्याविषयी जागरूकतेचा जागर

**भारत संग्राम | प्रतिनिधी**

**वाशिम :** जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, वाशिम आणि जिल्हा विधिज्ञ मंडळ, वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने श्री समर्थ विद्यालय, सुंदर वाटिका येथे कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांमध्ये कायद्याविषयी जागरूकता निर्माण करणे, त्यांच्या हक्क व कर्तव्यांची जाणीव करून देणे आणि संविधानिक मूल्यांविषयी माहिती देणे, हा कार्यक्रमाचा उद्देश होता.

कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या गीताने झाली. अध्यक्षस्थानी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव व्ही. जी. चौखंडे होते. त्यांनी विद्यार्थ्यांना कायद्याचे महत्त्व, संविधानिक मूल्ये आणि जबाबदार नागरिक म्हणून कर्तव्ये याविषयी मार्गदर्शन केले.





यावेळी जिल्हा वकील संघाचे उपाध्यक्ष ॲड. वैभव तिफणे यांनी लोकसंख्या आणि 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' अभियान या विषयावर मार्गदर्शन केले. मुख्यन्यायरक्षक ॲड. परमेश्वर आ. शेळके यांनी पीडित भरपाई योजना याबाबत माहिती दिली. तसेच जिल्हा वकील संघाचे सचिव ॲड. डी. डी. गुडदे यांनी लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण (पॉक्सो) कायदा तसेच बालकांचे हक्क या विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमास श्री समर्थ विद्यालयाचे मुख्याध्यापक सतीश हागे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांनी विद्यार्थ्यांनी कायद्याची माहिती आत्मसात करून जबाबदार आणि सजग नागरिक बनावे, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बोंडे सर यांनी केले, तर प्रणव बोलवार यांनी आभार मानले. कार्यक्रमाला विद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जागतिक न्याय दिनानिमित्त विधी क्षेत्रातील मान्यवरांचा न्याय, समता व कायदेविषयक जनजागृतीवर भर

**भारत संग्राम | प्रतिनिधी**

**वाशिम :** जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, वाशिम आणि जिल्हा विधिज्ञ मंडळ, वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक न्याय दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन १७ जुलै रोजी जिल्हा व सत्र न्यायालयातील कक्ष क्रमांक १३ येथे करण्यात आले.





कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या गीताने झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अनिल सुब्रमण्यम होते. त्यांनी न्यायव्यवस्थेत सर्वसामान्यांना सुलभ, समान व वेळेवर न्याय मिळण्याचे महत्त्व अधोरेखित करत न्यायाविषयी जनजागृतीची आवश्यकता स्पष्ट केली. यावेळी ज्येष्ठ विधिज्ञ जी. व्ही. मोरे यांनी जागतिक न्याय दिनाचे महत्त्व, न्यायव्यवस्थेची भूमिका आणि कायद्याच्या राज्याची संकल्पना याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास जिल्हा न्यायाधीश-१ जे. पी. झपाटे, जिल्हा न्यायाधीश-२ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश व्ही. डी. इंगळे, जिल्हा विधिज्ञ मंडळाचे अध्यक्ष ए. एस. बाकलीवाल, जिल्हा सरकारी अभियोक्ता ए. आर. व्यवहारे, तसेच मुख्यालयातील सर्व न्यायिक अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा वकील संघाचे सचिव डी. डी. गुडदे यांनी केले. जिल्हा वकील संघाचे उपाध्यक्ष वैभव तिफणे यांनी आभार मानले. या कार्यक्रमास न्यायिक अधिकारी, विधिज्ञ मंडळाचे सदस्य, पक्षकार तसेच न्यायालयीन कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण मोहिमेला अधिक गती देत सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे - जिल्हाधिकारी

**भारत संग्राम | प्रतिनिधी**

**वाशिम :** विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण (एसआयआर) मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी, मतदार यादीतील माहितीची अचूकता, गणना प्रपत्रांचे वेळेत वितरण,संकलन, डिजिटायझेशनसाठी सर्व संबंधितांनी परस्पर समन्वयाने नियोजनबद्ध पद्धतीने काम करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित 'विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण' आढावा बैठकीत ते बोलत होते. मोहिमेला अधिक गती देत सर्व यंत्रणांनी परस्पर समन्वयाने





आणि सूक्ष्म नियोजन करून काम करावे, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी विरेंद्र जाधव, नगरपालिका सहआयुक्त डॉ. बाबुराव बिक्कड, नगरपालिका प्रशासनाचे सहायक आयुक्त परदेशी तसेच जिल्ह्यातील सर्व मतदार नोंदणी अधिकारी (ERO), सहायक मतदार नोंदणी अधिकारी (AERO), पर्यवेक्षक आणि मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) दूरदृश्यप्रणालीद्वारे (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) या बैठकीला जोडले गेले होते. बैठकीत विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेच्या सद्यस्थितीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. गणना प्रपत्रांचे वितरण व संकलन, प्राप्त प्रपत्रांची तपासणी, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता, माहितीचे वेळेत आणि अचूक डिजिटायझेशन तसेच प्रत्येक टप्प्यावरील कामकाजाची नियमित पाहणी यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. जिल्हाधिकारी कुंभेजकर यांनी पुढे बोलतांना सांगितले की, मतदार यादीची शुद्धता, अद्ययावतता आणि विश्वासार्हता ही लोकशाही प्रक्रियेचा महत्त्वाचा पाया आहे. त्यामुळे एसआयआर मोहिमेतील प्रत्येक टप्पा अत्यंत जबाबदारीने आणि काटेकोरपणे पूर्ण करणे आवश्यक आहे. प्रत्येक गणना प्रपत्राची अचूक नोंद, आवश्यक कागदपत्रांची योग्य पडताळणी आणि माहितीचे वेळेवर डिजिटायझेशन याकडे विशेष लक्ष द्यावे. कोणतेही काम प्रलंबित राहणार नाही, यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी नियमित आढावा घेऊन आवश्यक कार्यवाही करावी, असेही त्यांनी यावेळी सांगितले. विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण मोहिमेबाबत नागरिकांमध्ये जनजागृती वाढविण्यासाठी आणि सर्व शंका-समस्यांचे निराकरण करण्यासाठी राजकीय पक्षांशी सातत्याने संवाद ठेवणे आवश्यक आहे. जिल्हास्तरावर राजकीय पक्षांच्या बैठका नियमितपणे आयोजित केल्या जात आहेत. त्याच धर्तीवर तालुकास्तरावरही सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या बैठका आयोजित करून मोहिमेच्या प्रत्येक टप्प्याची माहिती द्यावी, त्यांच्या सूचना जाणून घ्याव्यात आणि आवश्यक समन्वय साधावा, असे निर्देशही त्यांनी दिले.या मोहिमेची माहिती जिल्ह्यातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी व्यापक जनजागृती आणि प्रचार-प्रसिद्धीवर विशेष भर देण्यात यावा. एकही पात्र नागरिक मतदार नोंदणीपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता सर्व यंत्रणांनी घ्यावी. बैठकीत उपस्थित अधिकाऱ्यांनी त्यांच्या विभागाकडून सुरू असलेल्या कामकाजाची माहिती सादर केली. विविध विभागांमधील समन्वय अधिक प्रभावी करण्याबाबत, तसेच आगामी कालावधीत मोहिमेची गती कायम ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली. प्रत्येक टप्प्याचे नियमित परीक्षण करून निश्चित कालमर्यादेत सर्व कामे पूर्ण करण्याच्या सूचनाही जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी यावेळी दिल्या. विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण (एसआयआर) मोहिमेअंतर्गत १७ जुलै २०२६ रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत जिल्ह्यातील एकूण १०,१९,५१९ मतदारांपैकी ८,९९,२८० गणना प्रपत्रांचे वितरण पूर्ण झाले असून हे प्रमाण ८८.२१ टक्के आहे.

# अग्रलेख

## व्यापकता

भारतात वंचित सामाजिक गटांचा विकास तसेच यासारख्या विविध प्रश्नांवर काम करणाऱ्या सक्रिय स्वयंसेवी संस्थांची आणि सेक्शन ८ कंपन्यांची (ना नफा तत्त्वावर चालणाऱ्या सामाजिक कंपन्या ) संख्या नीती आयोगाच्या मते सहा लाखांवर गेली आहे. अशा संस्थांचे सर्वार्थाने सक्षमीकरण करणारे, त्यांना शाश्वतता – व्यापकता-सेवेची समावेशक दृष्टी देत समविचारी लोकांशी जोडणारे काही अदृश्य शिल्पकार असतात. असाच एक असामान्य मातृहृदयी संस्थापालक म्हणजे रमेशभाई गुलाबचंद कचोलिया. अस्तित्वाचा संघर्ष करणाऱ्या देशभरातील सुमारे दोन हजार संस्थांना सक्षम करण्यात आयुष्यातील ५० वर्षं आणि सर्वस्व त्यांनी दिले. ८८ वर्षांच्या रमेश भाईंचे नुकतेच १० जुलै रोजी निधन झाले. इंटरनेट आणि समाजमाध्यमांची आयुधे उपलब्ध होण्याआधीच्या काळात रमेशभाईंनी भारताच्या कानाकोपऱ्यातील प्रामाणिकपणे चालणाऱ्या समाजकार्याचा शोध सुरू केला. वृत्तपत्रे, संस्थांची माहितीपत्रके, पुस्तके ,मित्र आणि प्रवास यांच्या माध्यमातून ते दुर्गम भागांतील धडपड्या कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचत. संस्थेचे काम प्रत्यक्ष पाहणे, लाभार्थ्यांकडून थेट प्रतिसाद घेणे, संस्थापकाची आणि त्याच्या संघाची सचोटी तपासणे, त्यानंतर प्रथम स्वत:चा मोठा आर्थिक सहयोग देणे, संस्थेच्या दुर्बल बाजूंचा अभ्यासपूर्वक शोध घेऊन त्यावर संस्थेसोबत काम करणे, ती निकोप झाल्यावर तिच्या गरजांवर अन्य दात्यांसोबत काम सुरू करणे, अशी त्यांची कार्यपद्धती होती. विविध स्रोतांतून संस्थांना आर्थिक मदत मिळण्यासाठी ते संस्थाकार्याचे उत्तम शब्दांकन इंग्रजीत करून देत. संस्थेच्या कार्यकर्त्यांसह दात्यांना भेटून कार्याचे सादरीकरण कसे करावे याचे प्रत्यक्ष प्रशिक्षण देत. संस्थेबद्दल अनभिज्ञ असणाऱ्या दात्यांना हवी असणारी कामाच्या पारदर्शकतेची, बांधिलकीची आणि विश्वासार्हतेची हमी ते स्वत: देत. याच आधारे संस्थांना दात्यांचा सहयोग मिळे. पुढील दशकाचा वाटचालीचा आराखडा ते संस्थांना तयार करायला लावत. त्यासाठी चिकाटीने मार्गदर्शन करत. संस्था चालविणाऱ्यांना समाजकार्याचे औपचारिक शिक्षण आणि प्रशिक्षण घेण्यासाठी त्यांनी जगभर पाठविले. बंगालमधील हावडा येथील टिकियापाडा म्हणजे मुंबईच्या धारावीचे प्रतिरूप. येथे शबाना आणि मामून अख्तर या दाम्पत्याने आपल्या पत्र्याच्या खोपटीत सुरू केलेल्या समरिटन हेल्प मिशन या बालशिक्षण प्रयोगाची कहाणी त्यांना समजली. आर्थिक कोंडीमुळे हा प्रकल्प थबकला होता. ते टिकीयापाडा येथे गेले. वार्षिक ४०० रुपये आय-व्यय असणारी ही संस्था आता चार सुसज्ज शाळांमधून सुमारे १६ हजार विद्यार्थ्यांना उच्च माध्यमिक स्तरापर्यंत मोफत दर्जेदार शिक्षण देते. त्यांचा वार्षिक जमा-खर्च १६ कोटी रुपये आहे. आरोग्य, रोजगार आणि स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनाच्या माध्यमातून ती हावडा परिसरातील परिवर्तनाचे केंद्र बनली आहे. मध्य प्रदेशातून कोलकाता येथे शिक्षणासाठी आलेला विनायक लोहानी हा आय.आय.टी. आणि आय.आय.एम. मध्ये अव्वल ठरला. विनायकने त्याची उच्च वेतनाची नोकरी सोडून परिवार केंद्र ही संस्था वंचित मुलांच्या शिक्षणासाठी सुरू केली. रमेशभाईंच्या परिसस्पर्शामुळे ही संस्था तीन हजार मुलांचा निवासी शैक्षणिक प्रकल्प पश्चिम बंगालमध्ये चालवते. छत्तीसगड, मध्य प्रदेश, प. बंगाल आणि झारखंडमधील आदिवासी आणि ग्रामीण भागातील सहा लाखांवर मुलांच्या शिक्षणासाठी 'सेवा कुटीर' हा प्रकल्प राबवते. वर्ष २००० मध्ये भविष्य अधांतरी असलेल्या या प्रकल्पाची वार्षिक उलाढाल केव्हाच १०० कोटींवर गेली आहे. विनायकला केंद्र शासनाकडून मिळालेला पद्मश्री पुरस्कार त्याने रमेश कचोलिया यांना समर्पित केला आहे. विज्ञान शिक्षक राजीव वर्तक यांच्या प्रयोगाधारित शिक्षणाच्या स्वप्नाला संस्थात्मक स्वरूप मिळवून देण्यासाठी त्यांनी अध्ययन संस्थेला प्रोत्साहन दिले. गेल्या २५ वर्षांत या संस्थेने सहा हजार शिक्षकांना प्रशिक्षण देऊन १८ लाख विद्यार्थ्यांपर्यंत गुणवत्तापूर्ण शिक्षण पोहोचवले. तंत्रज्ञानाचा वापर करून सरकारी शाळेतील शिक्षणदर्जा उंचावण्याचे जीवनध्येय संजय दालमिया या आयआयटीच्या माजी विद्यार्थ्याने निवडले. त्याच्या ओपन लिंक फाऊंडेशनचा वर्ष २०१६ मधील आवाका मर्यादित आणि वार्षिक खर्च २५ हजार होता. रमेशभाई यांच्या सहभागाने या संस्थेचे विनोबा हे ॲप महाराष्ट्र, छत्तीसगढ आणि मध्य प्रदेशात तीन लाख शिक्षक आणि ३५ लाख विद्यार्थ्यांच्या वापरात आले. २५० तंत्रस्नेहींची टीम, १८ कोटींचा वार्षिक खर्च असा या संस्थेचा प्रवास एका दशकात झाला. वर्ष १९९८ मध्ये रमेशभाई अहिल्यानगरमधील स्नेहालय संस्थेत आले होते. जिल्ह्यातील १३ वेश्यावस्त्या आणि झोपडपट्ट्यांत फिरून त्यांनी प्रश्नाची दाहकता समजून घेतली. त्यावेळी स्नेहालयचे चार प्रकल्प होते आणि आर्थिक संसाधने अत्यल्प होती. रमेशभाईंचा वरदहस्त लाभल्याने स्नेहालयचे आठ जिल्ह्यांत एकूण २७ बहुविध सेवा प्रकल्प उभे राहिले. १८ हजार लाभार्थ्यांपर्यंत रोज सेवा पोहोचू लागल्या. भारतात वंचित सामाजिक गटांचा विकास तसेच यासारख्या विविध प्रश्नांवर काम करणाऱ्या सक्रिय स्वयंसेवी संस्थांची आणि सेक्शन ८ कंपन्यांची (ना नफा तत्त्वावर चालणाऱ्या सामाजिक कंपन्या ) संख्या नीती आयोगाच्या मते सहा लाखांवर गेली आहे. अशा संस्थांचे सर्वार्थाने सक्षमीकरण करणारे, त्यांना शाश्वतता – व्यापकता-सेवेची समावेशक दृष्टी देत समविचारी लोकांशी जोडणारे काही अदृश्य शिल्पकार असतात. असाच एक असामान्य मातृहृदयी संस्थापालक म्हणजे रमेशभाई गुलाबचंद कचोलिया. अस्तित्वाचा संघर्ष करणाऱ्या देशभरातील सुमारे दोन हजार संस्थांना सक्षम करण्यात आयुष्यातील ५० वर्षं आणि सर्वस्व त्यांनी दिले. ८८ वर्षांच्या रमेश भाईंचे नुकतेच १० जुलै रोजी निधन झाले. इंटरनेट आणि समाजमाध्यमांची आयुधे उपलब्ध होण्याआधीच्या काळात रमेशभाईंनी भारताच्या कानाकोपऱ्यातील प्रामाणिकपणे चालणाऱ्या समाजकार्याचा शोध सुरू केला. वृत्तपत्रे, संस्थांची माहितीपत्रके, पुस्तके ,मित्र आणि प्रवास यांच्या माध्यमातून ते दुर्गम भागांतील धडपड्या कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचत. संस्थेचे काम प्रत्यक्ष पाहणे, लाभार्थ्यांकडून थेट प्रतिसाद घेणे, संस्थापकाची आणि त्याच्या संघाची सचोटी तपासणे, त्यानंतर प्रथम स्वत:चा मोठा आर्थिक सहयोग देणे, संस्थेच्या दुर्बल बाजूंचा अभ्यासपूर्वक शोध घेऊन त्यावर संस्थेसोबत काम करणे, ती निकोप झाल्यावर तिच्या गरजांवर अन्य दात्यांसोबत काम सुरू करणे, अशी त्यांची कार्यपद्धती होती. विविध स्रोतांतून संस्थांना आर्थिक मदत मिळण्यासाठी ते संस्थाकार्याचे उत्तम शब्दांकन इंग्रजीत करून देत. संस्थेच्या कार्यकर्त्यांसह दात्यांना भेटून कार्याचे सादरीकरण कसे करावे याचे प्रत्यक्ष प्रशिक्षण देत. संस्थेबद्दल अनभिज्ञ असणाऱ्या दात्यांना हवी असणारी कामाच्या पारदर्शकतेची, बांधिलकीची आणि विश्वासार्हतेची हमी ते स्वत: देत. याच आधारे संस्थांना दात्यांचा सहयोग मिळे. पुढील दशकाचा वाटचालीचा आराखडा ते संस्थांना तयार करायला लावत. त्यासाठी चिकाटीने मार्गदर्शन करत. संस्था चालविणाऱ्यांना समाजकार्याचे औपचारिक शिक्षण आणि प्रशिक्षण घेण्यासाठी त्यांनी जगभर पाठविले. बंगालमधील हावडा येथील टिकियापाडा म्हणजे मुंबईच्या धारावीचे प्रतिरूप.

# गूराढोरांवर आपली आस्था असतांना;शहरात गुर-ढोर वा-यावर का?



मो.नं.९९२१६९०७७९
रमेश लांजेवार

**आपण पहातो ही, राज्यातील अनेक शहरांमध्ये गुरेढोरे लावारीस मोकाट फिरतांना दिसतात किंवा रस्त्यावर मोकाट जनावरांचा ठिय्या दिसून येतो.यामुळे वाहनचालकांचा किंवा जनावरांचा अपघात होऊन जीव धोक्यात येऊ शकतो आणि अशा अनेक दुर्घटना झाल्या सुध्दा आहेत व ही बाब सर्वांनाच ग्यात आहे. तरीही सरकार किंवा प्रशासन याकडे जातीने लक्ष देत नाही हा अत्यंत चिंतेचा आणि गंभीर विषय आहे.आपल्या हिंदू संस्कृतीमध्ये गायीला अत्यंत मोलाचे आणि महत्त्वाचे स्थान आहे त्यामुळे तीला गोमाता म्हणून संबोधले जाते.**

आज मोठ्या प्रमाणात गायी (गुरेढोरे) रस्त्याच्या कडेला किंवा रस्त्यावर किंवा मुलांच्या खेळण्याच्या ग्राऊंडमध्ये बसलेले दिसतात आणि आपल्या आहारासाठी व विसाव्यासाठी भटकत असतात. त्याचप्रमाणे गायी जेव्हा रस्त्यावर किंवा



वस्तीमध्ये फिरतात तेव्हा त्यांचा झुंड कचऱ्याच्या ढीगाऱ्याकडे जातांना जास्त दिसते कारण त्यांना आशा असते की, इथे मला काही तरी नक्कीच खायला मिळेल परंतु याठिकाणी त्यांच्या दृष्टीने संपूर्ण विषेली पदार्थ असतात.अशा परिस्थितीत गुरेढोरे जहरील्या वस्तू खातात;ज्या त्यांच्या शरीराला घातक असतात. उदाहरण द्यायचे झाले तर,प्लास्टिक,कपडा किंवा प्लॅस्टिकमध्ये इंजेक्शन किंवा ब्लेड किंवा विषेली पदार्थ सुद्धा असू शकतात;त्या जर त्यांच्या पोटात चुकीने गेल्या तर त्यांच्या जिवाला मोठा धोका निर्माण होऊ शकतो यालाही नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत मनपा प्रशासन व नगरसेवकांचे दायित्व असते की,गोरक्षाच्या माध्यमातून प्रत्येक जनावरांचा जीव वाचविला पाहिजे.परंतु त्यांची रक्षा न करता त्यांना वाऱ्यावर सोडल्याचे चित्र नागपूरसह राज्यातील अनेक शहरांमध्ये मोकाट फिरणाऱ्या गुराढोरांवरून लक्षात येते. उदाहरण द्यायचे झाले तर,नागपूर येथील प्रभाग क्रमांक ३१ मध्ये राजीव गांधी पार्क या ठिकाणी बास्केट बॉल ग्राउंड आहे. परंतु या ग्राउंडमध्ये मोठ्या प्रमाणात गुरेढोरे जमा होतात. अशा परिस्थितीत ते आपसात भिडतात व त्यांची टक्कर होते अशा परिस्थितीत बास्केटबॉल खेळणाऱ्या खेळाडूंचा अपघात होऊ शकतो. या संपूर्ण बाबींचा विचार करून मनपा प्रशासनाने आणि नगरसेवकांनी यावर तोडगा काढुन गुराढोरांसाठी योग्य जागा उपलब्ध करावी किंवा मोकाट जनावरांना गोशाळेत स्थान द्यावे.कारण गुरेढोरे रस्त्याच्या कडेला किंवा रस्त्यावर बसले असतात तेव्हा त्यांचा किंवा मानवी अपघात सुध्दा होऊ शकतो यालाही नाकारता येत नाही.याकरीता मोकाट फिरणाऱ्या जनावरांच्या पुनर्वसनासाठी प्रशासनाने पुर्वनीयोजीत उपाययोजना करणे गरजेचे आहे. मोकाट जनावरांचा सर्वसामान्यांना त्रास नाहीच परंतु त्यांच्या खानपानात विषेली वस्तू जाने किंवा कळतनकळत रस्त्यावर बसलेल्या जनावरांचा किंवा मानवी अपघात होने ही दुःख बाब आहे.त्यामुळे नागपूर शहरात असो अथवा राज्यातील इतर शहरात असो मोकाट गुराढोरांची व्यवस्था गोशाळेत व्हायला पाहिजे हे प्रशासनाचे दायित्व आहे.मुसळधार पाऊस,निसरडे रस्ते, रस्त्यावरील खड्डे,कमी झालेली दृश्यमानता आणि त्यातच अचानक समोर येणारे मोकाट जनावरे नागपूरकर वाहनचालकांसाठी हा अनुभव रोजचाच झाला आहे आणि हिच स्थिती राज्यातील अनेक शहरांमध्ये असु शकते. अशाप्रकारे पावसाळ्यात रस्त्यावर वाढलेल्या मोकाट जनावरांच्या वावरामुळे अपघातांचा धोका वाढला आहे. नागपूरसह राज्यातील अनेक शहरांमध्ये वर्षांगणिक मोकाट जनावरांचा प्रश्न अधिक गंभीर होत असल्याचे दिसून येते. यामुळे पावसाळ्यात संभाव्य अपघात टाळण्यासाठी मनपा प्रशासनाने तातडीने विशेष मोहीम राबवून मोकाट जनावरांना योग्य स्थान देऊन त्यांना गोशाळेत पाठविण्यात आले पाहिजे, तसेच निष्काळजी पशुपालकांवर कारवाई करून शहरातील प्रमुख रस्ते,मुलांचे खेळण्याचे ग्राउंड सुरक्षित करावेत.मोकाट जनावरांचा किंवा मोकाट जनावरांमुळे होणाऱ्या मानवी दुर्घटना टाळण्यासाठी प्रशासनाने मोकाट जनावरांचा कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता आहे. यामुळे मोकाट जनावरांची रहाण्याची, खानपानची योग्य सुविधा उपलब्ध होईल व अपघातावर आळा बसेल.जय हिंद!

# विठ्ठ माझा लेकुरवाळा;संगे गोपाळांचा मे



मो.नं.९९२१६९०७७९
रमेश लांजेवार

**पांडुरंग हे विष्णुचा अवतार आहे. त्यामुळे ते संपूर्ण सृष्टीचे पालनहार आहेत.परंतु महाराष्ट्रातील मराठी माणसासाठी विष्णू हे पांडुरंगाच्या(विठ्ठलाच्या)रूपात खरं तर महाराष्ट्राचे कुल दैवत आहे. आषाढ महिना हा विठ्ठलाच्या गजरात तल्लीन असतो.जनुकाय साक्षात विठ्ठल प्रगट झाल्याचे आपल्याला संपूर्ण महाराष्ट्रात दिसुन येते. महाराष्ट्रातील संतांच्या हृदयात स्थान असणारे अवघ्या महाराष्ट्राचे दैवत म्हणजे पंढरपूरचा विठूराया. मराठी वर्षांच्या आषाढ महिन्याच्या शुद्ध पक्षात जी एकादशी येते तिला आषाढी किंवा देवशयनी एकादशी असेही म्हणतात.याच एकादशीला महाएकादशी असेही म्हणतात. त्यामुळे या एकादशीला घरातील प्रत्येक लहान-मोठे व्यक्ती उपवास करून विठुरायाच्या चरणी पुजा-अर्चना करून नतमस्तक होऊन आपली मनोकामना पूर्ण करण्यासाठी आराधना करतात.**



वर्षातील एकूण २४ एकादशी पैकी आषाढी एकादशीला आगळेवेगळे महत्व आहे.कारण याच एकादशीला महाराष्ट्रातील लाखो भाविक,वारकरी वारी घेऊन पंढरपूरला जातात व प्रत्येकांना वाटते की जीवनात एकदा तरी वारी अनुभवावी म्हणजे आपण समजू शकतो की वारीचे दर्शन म्हणजे साक्षात पांडुरंगाचे दर्शन.महाराष्ट्राला संतांची भूमी संबोधले जाते.कारण महाराष्ट्रात संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत एकनाथ, संत जनाबाई, संत मुक्ताबाई यांच्या सारख्या महान संतांनी संत परंपरेचा वारसा जोपासला आहे. कोणी लहान नाही,कोणी मोठा नाही, सगळे समान व सारखे अशी समतेची भावना सर्व संतांनी लोकांच्या मनात रूजवीली आहे. त्यामुळेच आज संपूर्ण भारतात महाराष्ट्राला संतांची भूमी म्हणून संबोधले जाते.आजही संपूर्ण महाराष्ट्रात संतांचा वारसा दिसून येतो. ही महाराष्ट्रासाठी स्वाभिमानाची गोष्ट आहे.असेही म्हणतात की आषाढी एकादशी पासून चातुर्मासाची सुरूवात होते व आषाढी एकादशीला भगवान विष्णू शेष नागावर निद्रास्थ होतात आणि चातुर्मासानंतर कार्तिकेय एकादशीला जागे होतात.आषाढी एकादशीला आळंदीवरून ज्ञानेश्वराची, देहू वरून तुकारामाची, त्र्यंबकेश्वर येथुन संत निवृत्तीनाथांची, उत्तर भारतातून संत कबीर यांची,तर पैठणवरून एकनाथ महाराजांची पालखी पंढरपूरला विठोबाच्या दर्शनासाठी येतात. या पालख्यांबरोबर सर्व भाविक पायी विठू नामाचा गजर करत पंढरपूरला पोहचतात.एकादशीच्या दिवशी भाविक पहाटे उठून चंद्रभागेच्या तीरी स्नान करतात व तुळस वाहून विठ्ठलाची पुजा-अर्चना करतात.विठ्ठल म्हणजे साक्षात विष्णूचाच अवतार आहे.विठ्ठलाच्या चरणी मस्तक ठेवुन संपूर्ण भाविक मानवजातीच्या कल्याणासाठी आणि येणारे विघ्न दूर व्हावे यासाठी साकडे घालतात व राज्य सुजलाम सुफलाम होण्याची मनोकामना करतात. पौराणिक कथांमध्ये सुध्दा आषाढी एकादशीचा उल्लेख दिसून येतो.मृदुमान्य नावाच्या एका राक्षसाने भगवान शंकराची उपासना करून त्यांना प्रसन्न केले व मला मरण येणार नाही असा वर शंकरजी जवळुन मागुन घेतला.अशा परिस्थितीत मृदुमान्य राक्षसाने संपूर्ण देवतांवर विजय मिळविण्याचा निश्चय केला.अशा परिस्थितीत मृदुमान्य राक्षसाने ब्रम्हा,विष्णू आणि महेश यांचा शोध घेणे सुरू केले. अशावेळी ब्रम्हा, विष्णू, महेश एका गुहेत तीन दिवस लपून बसले.या तिघांच्या एकवटलेल्या श्वासापासुन "एकादशी देवता" उत्पन्न झाली व तिने मृदुमान्य राक्षसाचा वध केला.हीच ती आषाढी एकादशी होय. या दिवसांपासून चातुर्मास सुरू होतो. असा उल्लेख आपल्याला पुराणांमध्ये पहायला मिळते. विदर्भाचे पंढरपूर म्हणून धापेवाड्याची २८५ वर्षांची ओळख आहे.आजही आपल्याला आषाढी एकादशी पासून तर गुरूपौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी पर्यंत (आखाडीच्या दुसऱ्या दिवसांपर्यंत) धापेवाड्याला भव्य यात्रा दिसून येते. धापेवाड्याचे पांडुरंगाचे परमभक्त श्रीसंत कोलबाजी महाराज दरवर्षी पंढरपूरची वारी करून पांडुरंगाचे दर्शन घ्यायचे. त्यानंतर वृद्धापकाळाने कोलबाजी महाराज पंढरीची वारी करून शकले नाही याची खंत त्यांना वाटु लागली.ते विठ्ठलाचे परमभक्त असल्याने पांडुरंगाला आपल्या परमभक्ताची चिंता वाटायला लागली.अशा परिस्थितीत पांडुरंग श्रीसंत कोलबाजी महाराज यांच्या स्वप्नात येऊन पांडुरंगाने सांगितले की हे माझ्या परम भक्ता तु माझ्या पर्यंत येवू शकत नाही हे मला समजते.त्यामुळे मी स्वतः तुझ्या भेटीसाठी धापेवाड्याला येत आहे.असे पांडुरंगाचे बोलने ऐकुण श्रीसंत कोलबाजी महाराजांनी स्वतःला धन्य मानले व पांडुरंग धापेवाडास्थीत चंद्रभागेच्या काठाच्या विहीरीत स्वयंभू विठ्ठलमूर्तीच्या रूपात गुरूपौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे आषाढी पौर्णिमेच्या प्रतिपदेला प्रकट झाले. अशी आख्यायिका आहे. दरवर्षी आषाढ महिन्यात एकादशीच्या पाचव्या दिवशी म्हणजे गुरूपौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी धापेवाड्याला साक्षात पांडुरंग येतात.त्यामुळे धापेवाड्याला पांडुरंगाच्या दर्शनासाठी गुरूपौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी भक्तांची भव्य यात्रा आपल्याला पहायला मिळते.देवतांवर विजय मिळविण्यासाठी मृदुमान्य राक्षसाने ब्रम्हा,विष्णू, महेश यांचा शोध घ्यायला सुरुवात केली.अशा परिस्थितीत हे तिन्ही देवता एका गुहेत तीन दिवस लपून बसले.यांच्या श्वासातून एकादशी देवता निर्माण झाली व मृदुममान्य राक्षसाचा वध केला.असे पुराणात आहे.हीच गोष्ट आज आपल्याला लागू होते.आज पृथ्वीवरील संपूर्ण जीवजंतूसाठी श्वास (ऑक्सिजन) ची जोपासना करणे गरजेचे आहे यासाठी वृक्ष लागवड अत्यंत आवश्यक आहे.आज महाराष्ट्र अनेक दऱ्या, डोंगर व बंजार जमीन आहे.या संपूर्ण ठिकाणी मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करणे गरजेचे आहे. आपण पहाल की करोना काळात संपूर्ण जग ऑक्सिजनसाठी धडपडत होते.म्हणजे ऑक्सिजनला किती महत्त्व आहे ते आपल्याला करोनाने चांगल्याप्रकारे शिकविले.याकरीता पृथ्वीला व पृथ्वीवरील जीवसृष्टीला वाचविण्यासाठी सावधगिरीचे उपाय म्हणून घर तीथेच झाड,बंजार जमीन, गडकिल्ले या संपूर्ण ठिकाणी आषाढी एकादशीच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड व्हायला हवी.यासाठी मुख्यत्वेकरून सरकारने, सर्वसामान्यांनी,सरकारी अधिकाऱ्यांनी, राजकीय पुढाऱ्यांनी, सामाजिक संघटनांनी पुढाकार घेऊन वृक्षलागवडीला महत्त्व दिले पाहिजे.यामुळे गुरांना चारा व संपूर्ण जीवसृष्टीला ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल.कारण आज जंगल संपदा वाचविने काळाची गरज आहे.कारण प्रत्येक झाडात,पानांत, फुलात व फळात आपल्याला खऱ्याअर्थाने विठ्ठलाचे दर्शन घडल्याचे दिसून येईल. त्यामुळे आता सर्वांनीच वृक्ष लागवड करून काय डोंगर, काय झाडी, काय हिरवळ गालीचा समृद ओके करून प्रदूषणावर मात करायला हवी.जय हरी विठ्ठल! पांडुरंग हरी!

**भारत संग्राम (मराठी दैनिक) RNI No. MAHMAR/2020/79677**
मुद्रक - महादा आश्रु हिवाळे प्रकाशक - महादा आश्रु हिवाळे मालक - महादा आश्रु हिवाळे मुद्रण स्थळ - आधार प्रिंटर्स महामाया निवास, गौरीशंकर स्कुल के सामने, नालंदानगर, वाशिम ता.जि. वाशिम ४४४५०५ (महाराष्ट्र) प्रकाशन स्थळ - कार्यालय दैनिक " भारत संग्राम ", महामाया निवास, गौरीशंकर स्कुल के सामने, नालंदानगर, वाशिम ता.जि. वाशिम ४४४५०५ (महाराष्ट्र) संपादक - महादा आश्रु हिवाळे (सर्व वाद वाशिम न्यायालया अंतर्गत) प्रकाशित असलेल्या सर्व लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी.आर.बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार)

## थोडक्यात

### स्वयंचलित वाहन तपासणी केंद्र २० जुलैपासून सुरू

भारत संग्राम | प्रतिनिधी

**वाशिम :** केंद्र शासनाच्या रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाच्या अधिसूचनेनुसार दि. १ ऑक्टोबर २०२४ पासून सर्व प्रकारच्या व्यावसायिक वाहनांसाठी योग्यता प्रमाणपत्र तसेच योग्यता प्रमाणपत्राचे नूतनीकरण स्वयंचलित वाहन तपासणी केंद्रामार्फत करणे अनिवार्य करण्यात आले आहे. मोटार वाहन कायदा, १९८८ मधील नियम ५६ नुसार व्यावसायिक वाहनासाठी वैध योग्यता प्रमाणपत्र असणे बंधनकारक असून, नियम ३९ नुसार नोंदणीकृत नसलेले वाहन सार्वजनिक रस्त्यावर चालविण्यास मनाई आहे. या अनुषंगाने उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात दि. २० जुलै २०२६ पासून नवीन स्वयंचलित वाहन तपासणी केंद्र कार्यान्वित करण्यात येणार आहे. सुमारे ६९७ चौरस मीटर क्षेत्रफळावर उभारण्यात आलेल्या या केंद्रात १०३ चौरस मीटर क्षेत्रावर कार्यालयाची इमारत असून, दोन तपासणी मार्ग आणि दोन निरीक्षण खड्डे उपलब्ध आहेत. या केंद्रात दररोज सुमारे ८० व्यावसायिक वाहनांची तपासणी करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. वाहनधारकांनी योग्यता प्रमाणपत्राच्या नूतनीकरणासाठी http://vahan.parivahan.gov.in/AFMS या संकेतस्थळावर जाऊन राज्य, जिल्हा आणि वाहनाच्या प्रकारानुसार तपासणी मार्ग निवडावा. त्यानंतर उपलब्ध केंद्र निवडून पूर्वनियोजित वेळ आरक्षित करावी. वाहनाच्या नोंदणीकृत भ्रमणध्वनी क्रमांकावर प्राप्त होणारा एकवेळ संकेतांक (ओटीपी) नोंदवून विहित शुल्क ऑनलाइन भरावे. वाहनाच्या नोंदीमध्ये भ्रमणध्वनी क्रमांक अद्ययावत नसल्यास तो प्रथम अद्ययावत करून घ्यावा. प्रारंभी केंद्राचे कामकाज सुरळीत राहावे यासाठी मर्यादित वाहनांची नोंदणी स्वीकारण्यात येणार असून, पुढील काही दिवसांत केंद्र पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्यात येईल. वाहनधारकांनी पूर्वनियोजित दिवशी वाहन तपासणीसाठी उपस्थित राहताना वाहन सुस्थितीत ठेवावे. तसेच वाहनाची सर्व वैध कागदपत्रे, तसेच लागू असल्यास वाहन स्थान शोध यंत्रणा (व्हीएलटीडी), वेग मर्यादा नियंत्रक (एसएलडी) आणि परावर्तित परावर्तक पट्टयांबाबतची आवश्यक कागदपत्रे सोबत आणावीत, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी आनंद मेश्राम यांनी केले आहे.

## पान एक वरून

बॉलिवूड सुपरस्टार सलमान खान नुकताच मुंबईतील एका सार्वजनिक कार्यक्रमात बारीक दिसला. त्याच्या या नवीन लूकचे व्हिडिओ आणि फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर चाहते त्याच्या तब्येतीबद्दल चिंता व्यक्त करत आहेत. अनेक सोशल मीडिया वापरकर्त्यांचे म्हणणे आहे की तो खूप थकलेला आणि आजारी दिसत आहे, तर काही चाहत्यांनी त्याचे समर्थन करत म्हटले की, तो जवळपास 60 वर्षांचा असून कोणत्याही दिखाव्याशिवाय नैसर्गिक दिसत आहे. सलमान खान शुक्रवारी मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (SRA) कार्यालयात पोहोचला होता, जिथे त्याच्या या लूकने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. सलमान खान शुक्रवारी मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (SRA) कार्यालयात एका विशेष कार्यक्रमासाठी गेले होते. तेथे त्यांनी प्राधिकरणाच्या नवीन डेटा कलेक्शन अँड व्हेरिफिकेशन सपोर्ट सेंटर (आयटी सर्वर रूम) चे उद्घाटन केले.

# सलग पाचव्या वर्षी येवला पंचायत समितीचे अधिकारी-कर्मचारी पायी वारीत; लंडनच्या वारकरी किम स्मिथ यांची भेट ठरली आकर्षण





भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ प्रवीण पाटील

**नाशिक | येवला :** आषाढी वारी म्हणजे महाराष्ट्राच्या अध्यात्म, समता आणि भक्ती परंपरेचा जिवंत उत्सव. या पवित्र सोहळ्यात येवला पंचायत समितीचे कक्ष अधिकारी, विस्तार अधिकारी आणि कर्मचारी सलग पाचव्या वर्षी पायी वारी करत विठुरायाच्या चरणी भक्तिभावाने नतमस्तक झाले आहेत. "राम कृष्ण हरी", "जय जय राम कृष्ण हरी" आणि "ज्ञानोबा-तुकाराम"च्या अखंड जयघोषात त्यांची वारी भक्तिरसाने ओथंबून गेली आहे.

यंदाच्या वारीतील विशेष आकर्षण म्हणजे लंडनहून आलेल्या ९० वर्षीय वारकरी किम स्मिथ यांची झालेली अनपेक्षित भेट. डोक्यावर विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती घेऊन अत्यंत उत्साहाने पायी चालणाऱ्या किम स्मिथ यांची भक्ती पाहून अनेक वारकरी भारावून गेले. विस्तार अधिकारी अनिल जऱ्हाड यांनी या अविस्मरणीय क्षणाचा व्हिडिओही आपल्या सहकाऱ्यांसह जतन केला.

कक्ष अधिकारी अण्णा पैठणकर यांनी वारीचे महत्त्व सांगताना भावूक शब्दांत म्हटले, "विठ्ठलाची कृपा असल्यानेच आम्हाला जीवनात स्थैर्य आणि नोकरी मिळाली. आई-वडिलांनी दिलेले संस्कार आणि समाजसेवेची शिकवण जपत आम्ही दरवर्षी पायी वारी करतो. वर्षभर जनतेच्या सेवेत राहतो; मात्र आषाढी वारी कधीही चुकवत नाही." विस्तार अधिकारी अनिल जऱ्हाड म्हणाले, "वारीत श्रीमंत-गरीब, जात-पात, धर्म असा कोणताही भेदभाव नसतो. येथे प्रत्येक जण फक्त विठ्ठलाचा वारकरी असतो. साधुसंतांचा सहवास, अभंग, कीर्तन, ज्ञानेश्वरी, भागवत आणि पसायदानाचा संदेश मनाला नवी ऊर्जा देतो. त्यामुळे प्रत्येकाने आयुष्यात एकदा तरी पायी वारीचा अनुभव घ्यावा." वारीदरम्यान दीपक पाटील, योगेश शिंदे आणि गांगुर्डे मामा यांनीही वृद्ध महिला-पुरुष वारकऱ्यांना मदतीचा हात देत सेवाभावाचे दर्शन घडविले. थकलेल्या वारकऱ्यांना आधार देणे हीच विठ्ठल-रुक्मिणीची सेवा असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. वारीचा पाचवा-सहावा टप्पा पार करतानाही कोणताही थकवा जाणवत नसल्याचे सांगत अधिकारी-कर्मचारी म्हणाले की, विठ्ठलनामाच्या गजरात चालताना पायातील वेदना, संसारातील चिंता आणि दैनंदिन ताण आपोआप दूर होतात. संतांच्या अभंगातून मिळणारी जीवनमूल्ये समाजसेवेसाठी नवी प्रेरणा देतात. यावेळी संत तुकाराम महाराजांचा अभंग वारकऱ्यांच्या ओठांवर अखंड घुमत होता— "सुंदर ते ध्यान उभे विटेवरी, कर कटावरी ठेवोनिया..." तसेच, "विठ्ठल गीती गावा, विठ्ठल चित्ती ध्यावा; विठ्ठल उभा पहावा विटेवरी..." या अभंगांच्या सुरावटीत वारकरी विठुरायाच्या भेटीची आस मनात बाळगून पंढरीच्या दिशेने वाटचाल करत आहेत.

## 'तक्रारींचे राजकारण' की जनहिताची फसवणूक? 'मॅनेज' होऊन माघार घेणाऱ्या ढोंगी कार्यकर्त्यांवर अजय घुगे संतापले...

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ प्रदीप सावले



**मालेगाव :** जनहिताच्या नावाखाली प्रशासनाविरोधात तक्रारींचा पाऊस पाडणे,भ्रष्टाचाराचे आरोप करून आंदोलनाचे हत्यार उपसणे आणि सोशल मीडियावर प्रसिद्धीचा स्टंट करणे; पण नंतर अचानक संबंधित अधिकाऱ्यांशी किंवा पक्षांशी हातमिळवणी करून तक्रारी मागे घेणे,अशा प्रकारांवर मालेगावचे सामाजिक कार्यकर्ते अजय उत्तमराव घुगे यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. काही 'तथाकथित' कार्यकर्ते जनतेच्या प्रश्नांपेक्षा स्वतःचाच फायदा पाहत असून,हे समाजासाठी अत्यंत घातक असल्याचे घुगे यांनी स्पष्ट केले सामाजिक कार्यकर्ता अजय घुगे यांनी सांगितले की,शहरात सध्या तक्रारींचे राजकारण जोरात सुरू आहे काही पक्षांचे मोजके कार्यकर्ते जनहिताचे सोंग घेऊन प्रशासनावर दबाव निर्माण करतात. सोशल मीडियावर भ्रष्टाचाराचे मोठे आरोप केले जातात,आंदोलनाच्या आणि आत्मदहनाच्या धमक्या दिल्या जातात मात्र,काही दिवसांतच हे प्रकरण अचानक थंड होते आणि तक्रार मागे घेतली जाते याचा अर्थ असा की,हे सर्व फक्त स्वतःचे काम करून घेण्यासाठी किंवा आर्थिक तडजोड करण्यासाठी केलेला 'स्टंट' असतो घुगे यांनी पुढे असेही सांगितले की,या कार्यकर्त्यांना त्यांच्या पक्षातील स्थानिक पदाधिकाऱ्यांचे वरदहस्त असल्यामुळे असे प्रकार वारंवार घडत आहेत यामुळे सामान्य नागरिकांमध्ये संशयाचे वातावरण निर्माण झाले असून,प्रामाणिक जनआंदोलनांवरून लोकांचा विश्वास उडत चालला आहे जनतेच्या भावनांशी खेळून स्वतःचा स्वार्थ साधणाऱ्या अशा ढोंगी कार्यकर्त्यांवर कडक कारवाई व्हायला हवी,असे मत घुगे यांनी व्यक्त केले यावेळी अजय घुगे यांनी वृत्तपत्रे आणि इतर प्रसारमाध्यमांनाही महत्त्वाचे आवाहन केले कोणतीही तक्रार किंवा आंदोलनाची बातमी प्रसिद्ध करण्यापूर्वी तिची सत्यता आणि पार्श्वभूमी तपासणे आवश्यक आहे केवळ प्रसिद्धी मिळवण्यासाठी केलेल्या तक्रारींना खतपाणी घालू नये जर एखादी व्यक्ती बातमी प्रसिद्ध झाल्यानंतर तक्रार मागे घेत असेल,तर अशा लोकांची नावे आणि त्यांचे कारनामे समाजासमोर उघड करणे ही काळाची गरज आहे,असे घुगे यांनी स्पष्ट केले जनहितासाठी प्रामाणिकपणे लढणारे आणि वैयक्तिक स्वार्थासाठी ढोंग करणारे यांच्यातील फरक समाजासमोर येणे आवश्यक आहे,असे त्यांनी ठामपणे सांगितले.

## राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानच्या विविध अर्थसहाय्य योजनांसाठी प्रस्ताव मागविले

भारत संग्राम | प्रतिनिधी

**वाशिम :** भारत सरकारच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत कार्यरत असलेल्या राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकाता यांच्या समान निधी व असमान निधी योजनांद्वारे राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध अर्थसहाय्य योजना राबविण्यात येत आहेत. सन २०२६-२७ या वर्षासाठी या योजनांचा लाभ घेण्यासाठी शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांकडून विहित नमुन्यात प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. समान निधी योजनेंतर्गत ग्रंथालय इमारत बांधकाम व विस्तारासाठी कमाल २५ लाख रुपये अर्थसहाय्य उपलब्ध आहे. या योजनेव्यतिरिक्त इतर समान निधी योजनांचे प्रस्ताव केंद्रीय पातळीवर स्वीकारले जाणार असल्याने त्यासाठी प्रस्ताव सादर करू नयेत. असमान निधी योजनांमध्ये ग्रंथालय सेवा देणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना ग्रंथ, साधनसामग्री, फर्निचर तसेच इमारत बांधकाम व विस्तारासाठी अर्थसहाय्य, 'ज्ञान कोपरा' विकसित करण्यासाठी अर्थसहाय्य, विशेष आधुनिकीकरणासाठी सहाय्य, ग्रंथालयांच्या ५०, ६०, ७५, १००, १२५ व १५० वर्षांच्या महोत्सवी कार्यक्रमांसाठी अर्थसहाय्य, राष्ट्रस्तरीय चर्चासत्र, कार्यशाळा, प्रशिक्षण वर्ग व जनजागृती कार्यक्रमांसाठी सहाय्य तसेच 'बालकोपरा' स्थापन करण्यासाठी अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले जाणार आहे.या योजनांचे नियम, अटी आणि अर्जाचा नमुना www.rrrlf.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून इच्छुक ग्रंथालयांनी तेथून अर्जाचा नमुना डाउनलोड करावा. आवश्यकता असल्यास संबंधित जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. इच्छुक शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांनी वरीलपैकी कोणत्याही एका योजनेसाठी आवश्यक कागदपत्रांसह इंग्रजी किंवा हिंदी भाषेतील प्रस्तावाच्या चार प्रती संबंधित जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाकडे २९ ऑगस्ट २०२६ पर्यंत सादर कराव्यात. तसेच प्रस्ताव राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानच्या ऑनलाइन प्रणालीद्वारेही सादर करावेत, असे आवाहन ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्याचे प्रभारी ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर यांनी केले आहे.

## चिखली शहरातील अनधिकृत पार्किंगमुळे रुग्णवाहिकांना अडथळा

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ निलेश कोल्हे



**चिखली :** शहरातील मुख्य रस्त्यांवर वाढलेल्या अनधिकृत आणि बेकायदेशीर पार्किंगमुळे सामान्य नागरिकांसह रुग्णवाहिका, अग्निशमन दल आणि पोलीस पेट्रोलिंग गाड्यांना अडथळा निर्माण होत आहे. यामुळे नागरिकांच्या जीवनाला धोका निर्माण झाला असून याबाबत इंडियन रेडक्रॉस सोसायटी, बुलढाणा चे संचालक सुनिल धंधर पाटील यांनी दि. १८/०७/२०२६ रोजी चिखली पोलीस ठाण्यात निवेदन दिले आहे.रस्ते झाले पार्किंग, रुग्णांचे जीव धोक्यात

निवेदनात म्हटले आहे की, चिखली शहरातील मुख्य आणि सरकारी रस्त्यांवर मोठ्या प्रमाणावर वाहने बेकायदेशीरपणे उभी केली जात आहेत. यामुळे रस्त्यांना छावणीचे स्वरूप आले आहे. पादचाऱ्यांना चालण्यासाठी सुरक्षित जागा उरलेली नाही. सर्वात गंभीर बाब म्हणजे या अनधिकृत पार्किंगमुळे आपत्कालीन सेवांना अडथळा निर्माण होत आहे. रुग्णवाहिका वेळेवर रुग्णालयात पोहोचू शकत नाहीत. पोलीस पेट्रोलिंग आणि अग्निशमन दलाच्या गाड्यांनाही मार्ग मिळत नाही. यामुळे एखाद्या रुग्णाचा जीव धोक्यात येऊ शकतो. कलम २१ चा भंग - गुन्हे दाखल करण्याची मागणी सुनिल पाटील यांनी निवेदनात भारतीय राज्यघटनेच्या कलम २१ चा दाखला दिला आहे. या कलमानुसार प्रत्येक नागरिकाला सुरक्षित आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. सर्वोच्च न्यायालयानेही स्पष्ट केले आहे की नागरिकांना अडथळामुक्त, सुरक्षित रस्ते आणि फुटपाथ मिळणे हा त्यांच्या जगण्याच्या मूलभूत अधिकाराचा भाग आहे. चिखलीतील ही अनधिकृत पार्किंग नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे थेट उल्लंघन करत आहे. त्यामुळे दोषी वाहनधारकांवर कठोर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. कारवाईची मागणी रेडक्रॉसच्या वतीने पोलिसांना तातडीने अनधिकृत पार्किंग हटवून दोषींवर कायदेशीर कारवाई करण्याची विनंती करण्यात आली आहे. अन्यथा येत्या काळात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देखील देण्यात आला आहे.

## चिखली पोलिसांची मोठी कारवाई : एक बुलडाणा जिल्हा कारागृहात १ वर्षासाठी स्थानबद्ध तर दोघे ३ महिन्यांसाठी तडीपार

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ निलेश कोल्हे




**चिखली :** कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस निरीक्षक भूषण गावंडे,ठाणेदार चिखली यांनी स्वप्निल उर्फ संपत गजानन काकफळे वय २५ वर्ष याचा MPDA प्रस्ताव तयार करून मा. जिल्हाधिकारी महोदय बुलढाणा यांना सादर केला होता. सदर प्रस्तावावरून जिल्हा दंडाधिकारी, बुलढाणा यांच्या आदेशानुसार दि. १८ जुलै रोजी स्वप्नील काकफळे यास एक वर्षासाठी बुलढाणा जिल्हा कारागृह, येथे स्थानबद्ध करण्यात आले आहे. सदर इसमाविरुद्ध दुखापत करणे, जीवघेणा हल्ला, चोरी, रात्रीच्या वेळी चोरी करण्याच्या उद्देशाने संशयास्पदरीत्या फिरणे, गांजा सेवन करून सार्वजनिक शांतता भंग करणे, जुगार खेळविणे, गर्दीचा फायदा घेऊन चोरीचा प्रयत्न करणे अशा गंभीर स्वरूपाचे अनेक गुन्हे दाखल असून त्याच्या गुन्हेगारी व धोकादायक वर्तनामुळे चिखली शहर व परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते.याशिवाय साहिल राजेंद्र शिंगणे व अनिकेत शाम श्रीमंत या दोघांविरुद्धही महा. पोलीस कायदा कलम 56 नुसार प्रस्ताव तयार करून सादर केला असता त्यांना तीन महिन्यांसाठी बुलढाणा जिल्ह्यातून तडीपार करण्यात आले आहे. ही कारवाई मा पोलीस अधीक्षक निलेश तांबे, मा अपर पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक भूषण गावंडे यांच्या पोलीस अंमलदार अमोल गवई, विजय किटे, अजय इटावा, राहुल पायघन, प्रशांत धंदर,राहुल पायघन तसेच संजय भुजबळ स्था. गु.शा बुलडाणा यांनी यशस्वीरित्या पार पाडली.चिखली पोलिसांनी भविष्यातही सराईत गुन्हेगार व समाजकंटकांविरुद्ध अशाच कठोर कारवाई सुरू राहतील, असा इशारा दिला आहे.



## थोडक्यात

### धोडप येथे श्री विठ्ठल रखुमाई प्राणप्रतिष्ठा वर्धापन दिन महोत्सव उत्साहात साजरा....

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ निलेश कोल्हे



**चिखली :** तालुक्यातील धोडप येथे दर वर्षी प्रमाणे या वर्षी ५ वा श्री विठ्ठल रखुमाई प्राणप्रतिष्ठा वर्धापन महोत्सव मोठया उत्साहात व आनंदात साजरा करण्यात आला. १६/०७/२०२६ ते १८/०७/२०२६ तीन दिवसीय सप्ताह चे आयोजन करण्यात आले होते. काकडा, श्री संत गजानन महाराज ग्रंथ पारायण, हरिपाठ ,कीर्तन या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. श्री हरिदास महाराज, श्री ह.भ.प.येवले शास्त्री महाराजांनी किर्तन सेवा दिली. प.पु.श्री हरिचैतन्यानंद सरस्वतीजी महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने कार्यक्रमाची सांगता झाली. धोडप येथे आमदार सौ. श्वेताताई महाले पाटील यांनी या पंचक्रोशीसाठी विशेष बाब म्हणून ३० खाटा क्षमतेचे ग्रामीण रुग्णालय मंजूर केल्या मुळे वर्धापन दिनाचे औचित्य साधून मुख्यमंत्री मा.देवेंद्रजी फडणवीस यांचे खाजगी सचिव श्री विद्याधर महाले साहेब व आमदार सौ. श्वेताताई महाले पाटील यांचा सपत्नीक सत्काराचे आयोजन केले होते.या कार्यक्रमासाठी बुलढाणा भाजपा जिल्हाध्यक्ष बुलढाणा विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार विजयराज शिंदे व मुन्नाभाऊ बेंडवाल तसेच परिसरातून डोंगर शेवली, पळसखेड सपकाळ,शेलसूर,धोत्रा भनगोजी.शेलोडी, करवंड, चांधई, आधंई व इतर परिसरातील सरपंच, पोलीस पाटील तसेच सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. धोडप गावकऱ्यांनी या कार्यक्रमात अंकुशराव पाटील, नंदू कऱ्हाडे,अरविंद देशमुख,राजू पा.सावळे यांचा प. पु. स्वामीजींच्या हस्ते भेट वस्तू देऊन सत्कार करण्यात आला. त्याच बरोबर गावातील सर्व आजी-माजी सैनिक यांचासुद्धा प. पु. स्वामीजीचे हस्ते कार्यगौरव सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच पुढील वर्षी विठ्ठल रुक्माई प्राणप्रतिष्ठा वर्धापन महोत्सवालाअन्नदान सर्व आजी-माजी सैनिक करणार असल्याचे यावेळी आजी- माजी सैनिक यांच्याकडून सांगण्यात आले. तसेच विठ्ठल रखुमाई प्राणप्रतिष्ठा वर्धापन दिन महोत्सवानिमित्त भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते यावेळी डॉ.विशाल सावळे,डॉ.पवन राऊत, डॉ.वैभव सोळंकी,डॉ.तुषार चव्हाण आरोग्य तपासणी शिबिरामध्ये डॉक्टरांचे व त्यांच्या सहकारी टीम चे विशेष सहकार्य व उपस्थिती लाभली. सोहळ्याची सांगता आरतीने झाली. त्यानंतर गावातील सर्व नागरिक, महिला आणि लहान मुलांसाठी भव्य महाप्रसादाचे (भंडारा) आयोजन करण्यात आले होते. या महाप्रसादासाठी अन्नदाते संजय रामदास कोल्हे, पुरुषोत्तम पुंडलिक कोल्हे, प्रल्हाद फकीरा कोल्हे, मधुकर भगवान कोल्हे, डॉ. दत्तात्रय काशीराम कोल्हे यांचे विशेष योगदान लाभले गावातील सर्व स्तरांतील लोकांनी एकत्र येत या महाप्रसादाचा लाभ घेतला. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी गावातील ज्येष्ठ नागरिक, तरुण मंडळ, भजनी मंडळ, महिला भजनी मंडळ, महिला सेवाधारी,हरिपाठ मंडळ,आणि सर्व ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले. या निमित्ताने गावातील एकोपा आणि भक्तीचे दर्शन घडले.

# वारकऱ्यांच्या सेवेतून समाजसेवेचा वसा; इंदापूर तालुका ग्रामविकास प्रतिष्ठानचा प्रेरणादायी उपक्रम

### "वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे । पक्षीही सुस्वरे आळविती ॥" - संत तुकाराम महाराज

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ गणेश धनवडे





**इंदापूर :** संत सोपानकाका महाराज व संतराज महाराज पालखी सोहळ्याच्या भक्तिमय वातावरणात इंदापूर तालुका ग्रामविकास प्रतिष्ठान संचलित विश्वासराव रणसिंग महाविद्यालय कळंब ता. इंदापूर येथील राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाने समाजसेवेचा आदर्श घालून देत वारकऱ्यांना दहा हजार बिस्किट पुड्यांचे वाटप केले. हजारो वारकऱ्यांच्या सेवेसाठी राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे पालखी मार्गावर सेवाभाव, भक्ती आणि सामाजिक बांधिलकीचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला.

या उपक्रमाचा शुभारंभ प्रतिष्ठानचे विश्वस्त शंकरराव रणसिंग व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक काळंगे यांच्या हस्ते झाला. यावेळी उपप्राचार्य ज्ञानेश्वर गुळीग, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक, प्राध्यापक व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले. पालखी सोहळ्याच्या स्वागतावेळी महाविद्यालयातील प्राध्यापकांनी अभंग व भजनांच्या सुरावटींनी वातावरण भक्तिमय केले. महिला प्राध्यापकांनी फुगड्या खेळत आणि डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन वारकरी परंपरेचा उत्साहपूर्ण सन्मान केला. या सांस्कृतिक सहभागामुळे उपस्थित वारकऱ्यांमध्ये विशेष आनंदाचे वातावरण निर्माण झाले. इंदापूर तालुका ग्रामविकास प्रतिष्ठान ही संस्था शिक्षणासोबतच सामाजिक उत्तरदायित्व जपणारी संस्था म्हणून सातत्याने विविध समाजोपयोगी उपक्रम राबवत आहे. शिक्षण, संस्कार, सेवा आणि समाजहित यांचा समतोल साधणारी कार्यसंस्कृती संस्थेने जोपासली आहे. "शिक्षणाबरोबर समाजासाठी काहीतरी देणे हीच खरी संस्थेची ओळख आहे," या विचारातून प्रतिष्ठानची वाटचाल सुरू असून वारकरी सेवेचा हा उपक्रम त्याच सामाजिक जाणिवेचा प्रत्यय देणारा ठरला असल्याचे संस्थेचे सचिव विरसिंह रणसिंग यांनी सांगितले. या उपक्रमासाठी प्रतिष्ठानच्या अध्यक्षा आनंदी रणसिंग, उपाध्यक्ष प्रकाश कदम, खजिनदार वीरबाला पाटील, विश्वस्त कुलदीप हेगडे, विश्वस्त राही रणसिंग यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या प्रेरणेने राष्ट्रीय सेवा योजना विभागाने वारकऱ्यांच्या सेवेला प्राधान्य देत समाजसेवेचा संदेश कृतीतून दिला. भक्ती, सेवा आणि सामाजिक उत्तरदायित्व यांचा संगम घडविणारा हा उपक्रम वारकरी संप्रदायाच्या सेवाभावी परंपरेला साजेसा ठरला असून, समाजहितासाठी सातत्याने कार्य करणाऱ्या इंदापूर तालुका ग्रामविकास प्रतिष्ठानच्या कार्याची ही आणखी एक प्रेरणादायी नोंद ठरली असल्याचे सांगत उपक्रमाविषयी वारकऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

## लोकशाहीचे धडे गिरवत बालविकास मंदिर प्राथमिक शाळा येथे विद्यार्थी प्रतिनिधी निवडणूक संपन्न...

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ प्रदीप सावले



मालेगाव : येथील तहसील कार्यालया जवळ बोरगाव रोड वरील श्री व्यंकटेश सेवा समिती वाशिम द्वारा संचालित बालविकास मंदिर प्राथ शाळा मालेगाव येथे या शैक्षणीक सत्रातील शाळा प्रतिनिधी निवडणूक घेण्यात आली सदर निवडणुकीसाठी केंद्राध्यक्ष म्हणून शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल भिसडे,निवडणूक निर्णय अधिकारी नंदकिशोर भुसारी,मतदान अधिकारी,विठ्ठल कुटे,अनिलकुमार सरकटे यांनी जबाबदारी पार पडली विद्यार्थ्यांना शालेय जीवनामध्ये लोकशाहीचे महत्त्व कळावे आणि मतदान प्रक्रियेची संपूर्णपणे माहिती होण्यासाठी शाळा स्तरावर ही निवडणूक घेण्यात आली या निवडणुकी मध्ये इच्छुक उमेदवारांची निवड शाळेमधून करण्यात आली व विद्यार्थ्यांचा समावेश व मतपत्रिका वाटप करून विद्यार्थी निवडणूक घेण्यात आली पुढील प्रमाणे शालेय मंत्रिमंडळ निवड करण्यात आली शाळा स्तरावर शाळा मंत्रिमंडळ क्र. पद नाव 1.शाळा मुख्यमंत्री-आरव अमोल इंगळे 2.शाळा उपमुख्यमंत्री - कु.गौरी कैलास काटेकर 3.क्रीडामंत्री -शेख अफान शेख आसिफ 4.अर्थमंत्री- कु.स्वरा नागसेन खिल्लारे 5.ऊर्जामंत्री -कार्तिक गणेश चोरमले 6.शा. पो.आ.मंत्री- मोहम्मद असद मोहम्मद रफीक 7 स्वच्छता मंत्री-कु. श्रावणी संतोष भालेराव 8.परिपाठ मंत्री- कु.अक्षरा अविनाश घुगे 9.वृक्षसंवर्धन मंत्री-कु.पारुल शालिक खिल्लारे 10.उपस्थिती ध्वजमंत्री- आयुष जीवन बेलारकर इत्यादी मंत्र्यांची नेमणूक करण्यात आली यानंतर शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल भिसडे यांनी विद्यार्थ्यांना लोकशाही चे महत्त्व सविस्तरपणे पटवून दिले निवडून आलेल्या मंत्र्यांना आपापली जबाबदारी समजून सांगितली या निवडणुकित निवडून आलेल्या विजयी विद्यार्थ्यांचे शपथविधी घेऊन,त्यांचे स्वागत शाळेतील उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले सदर शालेय निवडणुकीचे आयोजन विभाग प्रमुख गणेश इढोळे यांनी केले सदर निवडणुकीच्या यशस्वीतेसाठी शाळचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षक वृंदानी मोलाचे सहकार्य करून कार्यक्रम यशस्वी रित्या पार पाडला.

## पावसाचा खंड कालावधीत पिकांची शास्त्रीय पद्धतीने काळजी घ्यावी

भारत संग्राम | प्रतिनिधी

**वाशिम :** यंदाच्या खरीप हंगामात काही भागांमध्ये पावसाचा खंड पडल्याने जमिनीतील ओलावा कमी होत असून खरीप पिकांवर पाण्याचा ताण येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी घाबरून न जाता शास्त्रीय पद्धतीने पिकांचे व्यवस्थापन करावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आरिफ शाह यांनी केले आहे.

जमिनीत पुरेसा ओलावा नसताना उगवणीनंतर वापरावयाची तणनाशके तसेच विविध संप्रेरके, बुरशीनाशके आणि कीटकनाशकांची अनावश्यक फवारणी टाळावी. पाण्याच्या ताणाच्या अवस्थेत रासायनिक फवारणीमुळे पिकांवर अतिरिक्त ताण निर्माण होण्याची शक्यता असते. जमिनीत किंचित ओलावा असल्यास हलका डवऱ्याचा फेर देऊन अंतरमशागत करावी. मात्र खोल मशागत टाळावी. मशागत करताना पिकांच्या मुळांना इजा होणार नाही, याची विशेष काळजी घ्यावी. सलग सात ते आठ दिवस पावसाचा खंड राहून पिके सुकण्याची लक्षणे दिसू लागल्यास कृषी तज्ज्ञांच्या सल्ल्याने १३:०:४५ (पोटॅशियम नायट्रेट) हे खत १०० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात फवारावे. ज्या शेतकऱ्यांकडे संरक्षित सिंचनाची सुविधा उपलब्ध आहे त्यांनी ठिबक किंवा तुषार सिंचनाद्वारे हलके पाणी देऊन पिकांवरील ताण कमी करावा.

## सलग पाचव्या वर्षी येवला पंचायत समितीचे अधिकारी-कर्मचारी पायी वारीत; लंडनच्या वारकरी किम स्मिथ यांची भेट ठरली आकर्षण

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ प्रवीण पाटील

**नाशिक | येवला :** आषाढी वारी म्हणजे महाराष्ट्राच्या अध्यात्म, समता आणि भक्ती परंपरेचा जिवंत उत्सव. या पवित्र सोहळ्यात येवला पंचायत समितीचे कक्ष अधिकारी, विस्तार अधिकारी आणि कर्मचारी सलग पाचव्या वर्षी पायी वारी करत विठुरायाच्या चरणी भक्तिभावाने नतमस्तक झाले आहेत. "राम कृष्ण हरी", "जय जय राम कृष्ण हरी" आणि "ज्ञानोबा-तुकाराम"च्या अखंड जयघोषात त्यांची वारी भक्तिरसाने ओथंबून गेली आहे.

यंदाच्या वारीतील विशेष आकर्षण म्हणजे लंडनहून आलेल्या ९० वर्षीय वारकरी किम स्मिथ यांची झालेली अनपेक्षित भेट. डोक्यावर विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती घेऊन अत्यंत उत्साहाने पायी चालणाऱ्या किम स्मिथ यांची भक्ती पाहून अनेक वारकरी भारावून गेले. विस्तार अधिकारी अनिल जऱ्हाड यांनी या अविस्मरणीय क्षणाचा व्हिडिओही आपल्या सहकाऱ्यांसह जतन केला.

कक्ष अधिकारी अण्णा पैठणकर यांनी वारीचे महत्त्व सांगताना भावूक शब्दांत म्हटले, "विठ्ठलाची कृपा असल्यानेच आम्हाला जीवनात स्थैर्य आणि नोकरी मिळाली. आई-वडिलांनी दिलेले संस्कार आणि समाजसेवेची शिकवण जपत आम्ही दरवर्षी पायी वारी करतो. वर्षभर जनतेच्या सेवेत राहतो; मात्र आषाढी वारी कधीही चुकवत नाही." विस्तार अधिकारी अनिल जऱ्हाड म्हणाले, "वारीत श्रीमंत-गरीब, जात-पात, धर्म असा कोणताही भेदभाव नसतो. येथे प्रत्येक जण फक्त विठ्ठलाचा वारकरी असतो. साधुसंतांचा सहवास, अभंग, कीर्तन, ज्ञानेश्वरी, भागवत आणि पसायदानाचा संदेश मनाला नवी ऊर्जा देतो. त्यामुळे प्रत्येकाने आयुष्यात एकदा तरी पायी वारीचा अनुभव घ्यावा." वारीदरम्यान दीपक पाटील, योगेश शिंदे आणि गांगुर्डे मामा यांनीही वृद्ध महिला-पुरुष वारकऱ्यांना मदतीचा हात देत सेवाभावाचे दर्शन घडविले. थकलेल्या वारकऱ्यांना आधार देणे हीच विठ्ठल-रुक्मिणीची सेवा असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. वारीचा पाचवा-सहावा टप्पा पार करतानाही कोणताही थकवा जाणवत नसल्याचे सांगत अधिकारी-कर्मचारी म्हणाले की, विठ्ठलनामाच्या गजरात चालताना पायातील वेदना, संसारातील चिंता आणि दैनंदिन ताण आपोआप दूर होतात. संतांच्या अभंगातून मिळणारी जीवनमूल्ये समाजसेवेसाठी नवी प्रेरणा देतात. यावेळी संत तुकाराम महाराजांचा अभंग वारकऱ्यांच्या ओठांवर अखंड घुमत होता— "सुंदर ते ध्यान उभे विटेवरी, कर कटावरी ठेवोनिया..." तसेच, "विठ्ठल गीती गावा, विठ्ठल चित्ती ध्यावा; विठ्ठल उभा पहावा विटेवरी..." या अभंगांच्या सुरावटीत वारकरी विठुरायाच्या भेटीची आस मनात बाळगून पंढरीच्या दिशेने वाटचाल करत आहेत.

## सत्यशोधक अण्णाभाऊ साठे बहुउद्देशीय फाउंडेशनच्या पुढाकाराने स्मृतिदिनानिमित्त अभिवादन

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ निलेश कोल्हे



**चिखली :** जगविख्यात साहित्यिक, लोकशाहीर, साहित्यरत्न, सत्यशोधक अण्णाभाऊ साठे यांच्या ५७ व्या स्मृतिदिनानिमित्त चिखली येथे त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. सत्यशोधक अण्णाभाऊ साठे बहुउद्देशीय फाउंडेशन व मातंग सेवा प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित कार्यक्रमात अण्णाभाऊंच्या साहित्यिक, सामाजिक आणि परिवर्तनवादी कार्याला उजाळा देण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. यावेळी चिखलीचे नगराध्यक्ष पंडितदादा देशमुख, उपनगराध्यक्ष पती कपिल खेडेकर, चिखली तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष नितीन फुलझाडे, माजी नगरसेवक गोविंद देव्हडे,युवा नेते भाई छोटु कांबळे, ज्येष्ठ नेते गजानन पवार, सिद्धेश्वर ठेंग, मंगेश ठेंग यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना नगराध्यक्ष पंडितदादा देशमुख म्हणाले, "अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या लेखणीतून अन्यायाविरोधात बुलंद आवाज निर्माण केला. 'फकिरा' ही केवळ कादंबरी नसून सामाजिक क्रांतीची मशाल आहे. त्यांच्या समतेच्या, शिक्षणाच्या आणि संघर्षाच्या विचारांचा वारसा समाजाने पुढे नेणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल." या कार्यक्रमाचे आयोजन सत्यशोधक अण्णाभाऊ साठे बहुउद्देशीय फाउंडेशनचे अध्यक्ष भाई छोटू कांबळे यांच्या पुढाकाराने करण्यात आले. कार्यक्रमास युवा सेना चिखली शहरप्रमुख राजेश पवार,सत्यशोधक अण्णाभाऊ साठे फाउंडेशनचे उपाध्यक्ष दिलीप काळे, सचिव कृष्णा साळवे,कोषाध्यक्ष आकाश गायकवाड, सहसचिव प्रतिभा कांबळे, गजानन गायकवाड, सागर कांबळे, रमेश घाडगे, सुभाष घाडगे, सचिन कांबळे, अमोल मिसाळ, श्याम सगट,अमोल साबळे, विजय निकाळजे, सागर खरात, स्वप्निल कांबळे, , हरिदास उमक, गजानन उन्हणे, नितीन गायकवाड,विजय जवंजाळ, अक्षय घाडगे, मारोती घाडगे, मंगेश घाडगे, आकाश खंडारे, सोमनाथ निकाळजे, तसेच मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्य, सामाजिक कार्य आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील योगदानाचे स्मरण करत त्यांच्या विचारांचा वारसा समाजात अधिक प्रभावीपणे रुजविण्याचा संकल्प व्यक्त केला.

